सकाळ



हॅप्पी पेरेंटिग...

डॉ. सुनील गोडबोले



# हॅप्पी पेरेंटिग : बात-‘चॅट’

डॉ. सुनील गोडबोले, बालविकास तज्ज्ञ.

Published on : 28 January 2023

नुकत्याच दोन बातम्या एकापाठोपाठ एक अनुभवल्या. एक- ‘चॅट जीपीटी’ या ॲपवर शब्द दिले, तर हव्या त्या स्टाईलमध्ये कविता करून मिळते आणि दुसरी- पुण्यातल्या आठवी ते दहावीमधल्या विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या सुंदर कवितांच्या संकलनाचे पुस्तक - ‘युवल’ प्रकाशित झाले.

आता कौतुक कशाचे करायचे त्याचा प्रश्न पडतोय! संगणकाच्या कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून साहित्यनिर्मिती, सुंदर चित्र निर्माण करणे, थ्रीडी प्रिंटरच्या मदतीने शिल्प बनवणे, किंवा डीप ब्ल्यूसारख्या बुद्धिबळ खेळणाऱ्या संगणकाने जागतिक कीर्तीच्या बुद्धिबळपटूंना हरवणे - या व अशा अनेक प्रांतांमध्ये संगणक माणसाच्या नैसर्गिक बुद्धिमत्तेला आव्हान देऊ लागलाय. आणखी एक उदाहरण म्हणजे माणसानेच

निर्माण केलेले दोन चॅटबॉट संभाषण करता करता एवढे पुढे गेले, की त्यांच्यातला संवाद त्यांच्या निर्मात्यांना कळेनासा झाला व शेवटी निर्मात्यांनी त्या चॅटबॉट्ना बंद करून टाकले!

त्या पार्श्वभूमीवर पालकांसाठी वेगळीच काळजी जन्माला येत आहे. मुले लिखाणाच्या ऐवजी  गुगल/ ॲलेक्साला सांगून गृहपाठ करून घ्यायला लागलीत! मुलांच्या बुद्धिमत्तेला चालना देण्यासाठी दिलेले प्रकल्प विकीपीडियाच्या मदतीने चकाचक प्रिंट होऊन येत आहेत! एकेकाळी निबंधलेखन- त्यातले सुविचार, नवीन विचारांची क्रमबद्ध मांडणी वगैरे अत्यंत महत्त्वाचे मानले जायचे. आता विचार फक्त एकच - गुगल सर्चमध्ये टाईप करायचे - अख्खा निबंध तयार! त्यातल्या त्यात लिहायचे काय ते कष्ट! संगीत क्षेत्रातसुद्धा अनेक वाद्यांचा सुरेल वाद्यवृंद संपून 'कराओके' उरले.

पण त्यातून आपल्या मुलाच्या नैसर्गिक बुद्धिमत्तेला वावच मिळणार नाही. पु. ल. देशपांडे, शांता शेळके, ग. दि. माडगूळकर, विश्वनाथन आनंद, शिल्पकार नानासाहेब करमरकर परत जन्माला येतील का? पैसा मिळवून जगता येईल; पण जगण्याचा आनंद मिळवायचा असेल, तर 'साहित्य-नाट्य-कला-क्रीडा' हवेतच. आणि हे जर तुम्हा आम्हा मोठ्यांना कळले नाही, तर आपणच आपल्या पुढच्या पिढीचे आयुष्य कृत्रिम, यंत्रवत करणार! जीवनात आनंद कसा मिळवायचा, हेच त्यांना कळेनासे होईल. एकमेकांशी हसत खेळत घडणारी बातचित फक्त कृत्रिम, बेगडी, सोशल मीडियावरची 'बात-चॅट' होऊन जाईल?

**अशी करू या 'बात-चॅट'**

- मुलांच्या आवडत्या विषयांवर, चेहऱ्यावर थोडेसे अज्ञान ठेवून, गप्पा मारा.
- मुलंचा मेंदू 'चॅट जीटीपी'पेक्षा जास्त 'भारी' आहे; त्याला आव्हान द्या! उदाहरणार्थ, अर्धी गोष्ट पूर्ण करणे, शब्दांवरून गोष्ट तयार करणे, कोडी घालणे.
- एखादे पुस्तक वाचून त्यातील संकल्पनेवर मुलांशी संवाद साधा. (फक्त उपदेशाचे डोस नक्की टाळा.)
- जाणीवपूर्वक चांगली नाटके, संगीताचे कार्यक्रम मुलांना दाखवा. वेळ मर्यादित असला तरी चालेल.
- चित्रपट, टीव्हीवरचा कार्यक्रम बघितल्यावर त्यातून काय कळले याची न विसरता चर्चा करा

(लेखक ज्येष्ठ बालविकासतज्ज्ञ आहेत.)

www.chiranjeevgodbole.com